वर्ष १९ वे

अंक १ ला

परिस्थिती सुधारत नसते, तर.....
परिस्थितीत बदल घडवून आणल्याने आपण सुधारत असतो.




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

Website : http://www.parnermitramandalpune.com/

यांचे मुखपत्र

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण **१६०** विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१८**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०१९**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- **रु. दहा लक्ष** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- **रु. एक लक्ष** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- **रु. ११,०००** व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# संपादकीय

प्रिय सभासद बंधु व भगिनींनो,

दि. १९.०८.२०१८ रोजी आपल्या मंडळाचा विद्यार्थी गुणगौरव, ग्रामस्थ गौरव कार्यक्रम व स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पुणे येथील नवीन जिल्हा परिषद इमारतीच्या सभागृहामध्ये पार पडला. सदर कार्यक्रमासाठी **श्री.संभाजी लांगोरे, श्री. बलभीम पठारे व श्री.दशरथ बोरूडे हे प्रमुख पाहुणे** लाभले होते. कार्यक्रमाचा वृत्तांत श्री.सुनील पोटे यांनी या अंकात दिला आहे.

आपल्या **मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके व त्यांच्या सहचारिणी विमलताई घोडके यांचाही अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कृतज्ञता सत्कार मंडळातर्फे करण्यात आला**. त्यांना दीर्घारोग्यासाठी सर्वांनी शुभेच्छाही दिल्या.

आपल्या मंडळाचे **बांधकाम समितीचे अध्यक्ष इंजि.विजयकुमार ठुबे त्यांच्या ३६ वर्षांच्या शासकीय सेवेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता तथा महाव्यवस्थापक (अभियांत्रिकी), महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ या पदावरून दि.३१.१०.२०१८ रोजी निवृत्त झाले** आहेत त्यांच्या पुढाकाराने आपल्या मंडळाची वसतिगृहाची ५ मजली इमारत त्यांच्याच मार्गदर्शनाखाली पूर्ण झाली आहे. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त पुणे येथे अण्णाभाऊ साठे सभागृहामध्ये नुकताच त्यांचा नागरी गौरव करण्यात आला. या अंकामध्ये **'कर्तृत्व पारनेरकरांचे'** या सदरामध्ये त्यांचा परिचय दिला आहे. त्यांना उर्वरित आयुष्यामध्ये निरोगी आरोग्य लाभो, ही पारनेर तालुका मित्र मंडळातर्फेशुभेच्छा !

या वर्षाच्या दिपावली सणाच्या वेळी मांडओहोळ धरणावर भेट दिली असता धरण पुर्णपणे कोरडे आढळून आले. या वर्षी आपल्या तालुक्यामध्ये पाऊसच झाला नसल्याने धरणात पाणी आले नाही. त्यामुळे या वर्षी दुष्काळाची दाहकता मोठ्या प्रमाणात जाणवणार आहे. आपल्या तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात भासणार आहे. त्यामुळे आतापासूनच आपल्याला तालुक्यासाठी पिण्याच्या पाण्याचेही योग्य नियोजन करणे आवश्यक आहे; याची गांभीर्याने नोंद घेण्याची गरज आहे, असे मला वाटते. त्यासाठी आपल्याकडून काही विधायक सूचना अपेक्षित आहेत.

**विद्यार्थी वसतिगृहासाठी कपाटे व लोखंडी पलंगांची व्यवस्था करावयाची आहे. त्यासाठी निधीची गरज आहे.** त्यासाठी आपल्याकडून भरीव योगदानाची अपेक्षा करतो. त्याचप्रमाणे आपणास विसर पडू नये म्हणून महिला वसतिगृहासाठी जमीन उपलब्ध करून देण्याविषयी आठवण करून देतो. त्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी विनंती करतो व संपादकीयास अर्धविराम देतो! **जय जिजाऊ। जय शिवराय।।**

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

**सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना**

# नववर्ष २०१९

**सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ही शुभेच्छा !**

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ | श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ | श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ | प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ | प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ | श्री.विलास ठुबे | सदस्य | ९४२३४६५९८४ |
| | | | श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |

# वसतिगृह प्रवेश

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे** चे सर्व सोयींनी युक्त असे **वसतिगृह** मंगलनगर, गल्ली नं. ८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे असून प्रवेशासाठी संपर्क साधावा.

**व्यवस्थापक - श्री.संजय जंगम - मो. ९४२३०२२१२३, ९९२१८५३३२३ (वेळ दु. ३ ते ८)**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१९.०८.२०१८ रोजी शरदचंद्र पवार प्रेक्षागृह, नवीन जिल्हा परिषद इमारत, पुणे ४११००१ येथे सकाळी १० ते १ या वेळेत संपन्न झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस सर्व मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे **मा.श्री.संभाजी लांगोरे, उपायुक्त, पुणे महसुल विभाग, महाराष्ट्र शासन** यांचा सत्कार **श्री.मधुकर शिरोळे** यांच्या शुभहस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष **श्री.बलभीम पठारे, उद्योजक व समाजिक कार्यकर्ते** यांचा सत्कार **श्री.अशोक वाबळे** यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यानंतर **पारनेर तालुका मित्र मंडळाचे अध्यक्ष आदरणीय श्री.हौसाराम घोडके आण्णांच्या पंचाहत्तरी निमित्त त्यांचा मंडळाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.** प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य फोटो व नवीन वस्त्र इ. भेट देण्यात आले. सुरुवातील उपस्थित **महिलांनी घोडके आण्णा व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.विमलाताई घोडके या दोघांचेही औक्षण केले.** याप्रसंगी उपस्थित मान्यवर व सभासद यांनी घोडके आण्णांना दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मंडळाचे जेष्ठ कार्यकारिणी सदस्य **श्री. काशिनाथ गायकवाड,** ७८ वर्षांचे झाल्याबद्दल यांचा सन्मान करण्यात आला.

यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. **प्रा.सुनील राजे निंबाळकर** यांनी सुत्रसंचालन व प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकामध्ये त्यांनी मंडळाच्या १९८० पासून आतापर्यंतच्या वाटचालीतील विविध कामकाजांचा आढावा घेतला. बुद्धीवैभव लाभलेला दर्या डोंगर पठारांचा हा तालुका आहे याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरी विद्यार्थ्यांची राहण्याची चांगली व्यवस्था व्हावी म्हणून **''पारनेर भवन''** नावाची पाच मजली देखणी वास्तु **इंजि.विजयकुमार ठुबे** यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाने उभी केली आहे. आजमितीस वसतिगृहामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत. दोन मजल्याचे वाढीव बांधकाम पूर्ण झाले असून १६० विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रतिमा पुजन झाल्यानंतर कार्यक्रमाचे मान्यवर व उपस्थित मंडळाचे सदस्य

प्रमुख पाहुणे **मा.श्री.संभाजी लांगोरे** यांचा परिचय **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी करून दिला. पारनेर प्रमाणेच कर्जत सारख्या मागास व दुष्काळी भागातून उच्च शिक्षण घेऊन उच्चतम पदावर पोहोचल्याचे **श्री.विजयकुमार ठुबे** यांनी नमूद केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष **श्री.बलभीम पठारे** यांचा परिचय करून देताना श्री.पठारे यशस्वी उद्योजक असून सामाजिक, शैक्षणिक कामात पुढाकार घेत असल्याचे श्री.विजयकुमार ठुबे यांनी सांगितले.

इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन **श्री.बाळासाहेब येणारे** यांनी केले तर बारावीच्या विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन **प्रा.गोरक्ष जगताप** यांनी केले. तसेच गुणवंत ग्रामस्थांचाही या प्रसंगी सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे, मा.अध्यक्ष व व्यासपीठावरील मंडळाचे सर्व पदाधिकारी यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थी व ग्रामस्थांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्यांना टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

यानंतर ग्रामस्थांपैकी **सुरक्षा तज्ञ श्री.दशरथ भाऊ बोरूडे यांनी आपल्या खुसखुसीत शैलीत व ग्रामीण बाज असलेल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व मंडळास रू.५०,०००/– ची देणगी दिली. यानंतर ज्येष्ठ उद्योजक व दानशूर श्री.बाळासाहेब मातेरे यांनी त्यांचे दिवंगत बंधु उद्योगपती गुलाबराव मातेरे यांचे स्मरणार्थ मंडळास रू.१,००,०००/– देणगी दिली.**











स्नेहमेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना १) मा.संभाजी लांगोरे, २) मा.बलभीम पठारे, ३) इंजि.विजयकुमार ठुबे, ४) मा.दशरथ बोरूडे, ५) मा.सुनील पोटे



मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके व त्यांच्या पत्नी सौ.विमलाताई घोडके यांचा अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार करताना मान्यवर.



मा.बाळासाहेब मातेरे यांनी मंडळास रू.१,००,०००/- देणगी दिल्याबद्दल श्री.रामदास शिर्के यांचे हस्ते सत्कार.



मा.दशरथ बोरूडे यांनी मंडळास रू.५०,०००/- देणगी दिल्याबद्दल मा.बलभीम पठारे यांचे हस्ते सत्कार.

प्रमुख पाहुणे **श्री. संभाजी लांगोरे** यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यशस्वी होण्यासाठी चिकाटी, जिद्द इ. आवश्यकतेचे प्रतिपादन त्यांनी केले. मंडळाच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी त्यांच्या **कर्जत तालुका मित्र मंडळासाठी पारनेर तालुका मित्र मंडळ ही एक आदर्श संस्था असल्याचे सांगितले.**

**मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके** यांच्या कार्याचाही श्री.लांगोरे यांनी आवर्जून उल्लेख केला व त्यांना दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष, यशस्वी उद्योजक **श्री.बलभीम पठारे** यांनी अध्यक्षीय भाषणामध्ये सर्व विद्यार्थी, गुणवंत ग्रामस्थ यांचा गुणगौरव केला. तसेच **पारनेर तालुका मित्र मंडळाचे काम नगरच नव्हे तर महाराष्ट्र राज्यासाठी आदर्श** असून पुढील कालावधीमध्ये मंडळास सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमानंतर मंडळाची सर्वसाधारण सभा पार पडली. या सर्व कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी **प्रा.सुनील निंबाळकर** यांनी समर्थपणे सांभाळली. मंडळाचे सचीव **श्री.सुनील पोटे** यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम समाप्तीनंतर मंडळातर्फे आयोजित केलेल्या भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला.

**शब्दांकन – सचीव सुनील पोटे**

# निधन वार्ता



❋ **हरिभाऊ जयसिंग नाईकवाडी,** वय ७१, रा. कान्हुर पठार यांचे दि. १४.०७.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे जावई **डॉ.जुगलकिशोर रेपाळे** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **किसन कोंडीबा आंधळे,** वय ९५, रा.कजुर्ले हरेश्वर यांचे दि.०४.०८.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.रामदास** यांनी **रू.११११/-** व सुपुत्र **श्री.विलास** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **गवराम पाटीलबा पुजारी,** वय ८५, रा.पारनेर यांचे दि.०५.०८.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.रामदास** व **श्री.भानुदास** यांनी मंडळास प्रत्येकी **रू.२००१/-** देणगी दिली.



❋ **इंदुबाई बजरंग झावरे,** वय ९२, रा.गारगुंडी यांचे दि.१०.०९.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.पारुनाथ** यांनी मंडळास **रू.२००१/-** देणगी दिली.




❋ **धनुर्धर माधव जाधव,** वय ७१, रा.मांडवे खुर्द यांचे दि.१२.०९.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.जयसिंग** यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



❋ **सुशिला शांताराम कावरे,** वय ८४, रा.सिद्धेश्वरवाडी यांचे दि.०८.१०.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे बंधु **श्री.हौसाराम घोडके** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❋ **रामभाऊ केशव साबळे,** वय ८३, रा.रूई छत्रपती यांचे दि.१३.१०.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.भाऊसाहेब** यांनी मंडळास **रू.२१००/-** देणगी दिली.



❋ **जयवंतराव राघुजी बांडे,** वय ८०, रा.टाकळी ढोकेश्वर यांचे दि.३०.१०.२०१८ रोजी निधन झाले.



❋ **सुभाष कृष्णाजी वाघमारे,** वय ७२, रा.चिंचोली यांचे दि. ०७.१०.२०१८ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.सोमेश्वर** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❋ **रामलाल गणपत धुमाळ,** वय ८८, रा.लोणी मावळा यांचे दि.१४.११.२०१८रोजी निधन झाले.

# आपण असे केले तर

❊ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१८ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे **प्रा. जगन्नाथ तुकाराम देंडगे**, रा. गांजीभोयरे व **श्री. नामदेव मारुती साबळे**, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास अनुक्रमे **रु.१०००/- व रू.१,५००/-** देणगी दिली.



❊ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१८ च्या वाढदिवसा निमीत्त पिताश्री **श्री.तुकाराम विठ्ठल नरसाळे**, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. २०००/-** देणगी दिली.



❊ **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे आडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.प्रविण** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि. २०.०२.२०१९ च्या व **कै. भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१८ च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.गणेश** यांनी मंडळास **रु.११२५/-** देणगी दिली.



❊ **कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा. पारनेर यांच्या दिनांक २३.१०.२०१८ च्या स्मृतीनिमित्त त्यांच्या पत्नी **श्रीमती मृदुला** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **कै. कृष्णाबाई सुखदेव पोटे**, रा.बाभुळवाडे यांच्या दि.२८.०७.२०१८ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.कुंडलीक सर** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे**, रा. कान्हुरपठार यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दिनांक २९.११.२०१८ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **कै. विष्णुपंत बापुराव कुलकर्णी**, रा.बाभुळवाडे यांच्या दिनांक ०२.०९.२०१८ च्या स्मृतीनिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.संतोष** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.महादेव गेणू आंबेडकर**, रा.हत्तलखिंडी यांनी सुपुत्र **चि.गणेश** याच्या दि.१४.०९.२०१८ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.




❊ **श्री.गंगाधर भिवा कोठावळे**, रा.सांगवी सुर्या यांनी **पिताश्री कै. भिवा शिवराम कोठावळे** यांच्या दि. १७.१०.२०१८ **व आई कै.सोनाबाई** यांच्या दि. ०३.०८.२०१८ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.प्रमोद दत्तात्रय काळे**, रा.शहाजापूर यांनी त्यांच्या दि.०१.११.२०१८ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **डॉ. सुधाकर रामचंद्र खराडे**, रा. निघोज यांनी त्यांच्या दि. ३१.१०.२०१८ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **सौ. रेखा सुनील शेटे**, रा.पारनेर यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दि. ३०.०७.२०१८ च्या वाढदिवसा निमित्त मंडळास **रू.२२२२/-** देणगी दिली.

❊ **ॲड.पद्माकर मार्तंड पोळ**, रा.पारनेर यांनी त्यांचे पिताश्री **कै.ॲड.मार्तंड मल्हार पोळ** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.




❊ **कै.सौ. सुशिला मारूती पोटघन**, रा. जातेगाव यांच्या दि.१७.०८.२०१८ रोजीच्या १०व्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **अविनाश** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. राजेंद्र खंडू थोरात**, रा. पाडळी आळे यांनी त्यांचे पिताश्री **कै.खंडू गेणू थोरात** यांचे दि. ११.११.२०१८ चे स्मृतीदिना निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.अशोक विश्वनाथ वाबळे** यांनी त्यांचे पिताश्री **कै.विश्वनाथ काशिनाथ वाबळे** यांच्या दि.१०.१०.२०१८ च्या स्मृतीप्रित्यर्थ मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **रामा एरंडे व परिवार** रा.वडझिरे यांच्यातर्फे **कै.नारायण बबनराव एरंडे** यांच्या दि.२३.०८.२०१८ च्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१८ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **श्री.अनिकेत** यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.

## अभिनंदन

❋ सनदी लेखापाल **श्री.शिवाजीराव भिकाजी झावरे यांची एशियन ओशियन स्टँडर्ड सेटर्स ग्रुप या संस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी २०१७ ते २०१९ या कालावधीसाठी निवड झाली.** सदर संस्थेचे १७ देश सदस्य असून, संस्थेचे ऑफिस लंडन येथे आहे.



❋ **सुरक्षा तज्ञ श्री.दशरथ भाऊ बोरूडे,** रा. पुणेवाडी यांनी मंडळास **रू.५०,०००/–** देणगी दिली. त्यांची एकूण देणगी **रू.१,१६,५५५/–** झाली आहे.



❋ **श्री.परशुराम लक्ष्मण जगताप,** रा.पिंपळगाव रोठा हे राज्य राखीव पोलीस दलामध्ये कार्यरत असून त्यांना **'सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक'** या पदावर बढती मिळाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.३०००/-** देणगी दिली.



❋ **श्री.विश्वास पोपट मोरे,** रा.वडझिरे हे संत साहित्याचे उपासक असून लोकमत, पिंपरी चिंचवड आवृत्तीचे **उपसंपादक** आहेत. त्यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने पत्रकारीता या विषयात **पी.एच्.डी.** मिळाली आहे. पत्रकारिता आंतर विद्या शाखांतर्गत **'लोककला, ललितकला - एक सामाजिक प्रबोधन, ऐतिहासिक अभ्यास'** असा त्यांच्या संशोधनाचा विषय होता.





❋ **कु.अभिलाषा संभाजी बांडे,** रा.टाकळी ढोकेश्वर हिला **इ.१० वी** मध्ये **९४ टक्के** गुण मिळाले.

❋ **अथर्व मुकुंद देंडगे,** रा.गांजी भोयरे यांस **इ.१० वी** मध्ये **८९ टक्के** गुण मिळाले.



## सेवानिवृत्ती

❋ **श्री. राम नामदेव पठारे,** रा. पारनेर हे ३३ वर्षांच्या सेवेनंतर दिनांक **३१.०७.२०१८** रोजी पोलीस विभागातून **डी.वाय.एस.पी.** या पदावरून सेवानिवृत्त झाले. एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून सेवाकाळात त्यांना अनेक पारीतोषिके प्राप्त झाली. पोलीस सेवेचे अत्युच्च अशा **'राष्ट्रपती पोलीस पदकाने'** त्यांचा सन्मान करण्यात आला.



❋ **श्री. शिवाजीराव बाळासाहेब चत्तर,** रा.सिद्धेश्वरवाडी हे ३९ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०८.२०१८** रोजी पाटबंधारे विभागातून **उप कार्यकारी अभियंता** या पदावरून सेवानिवृत्त झाले.



❋ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे,** रा.कान्हुर पठार हे ३६ वर्षांच्या सेवेनंतर सार्वजनिक बांधकाम विभागातून **दि. ३१.१०.२०१८** रोजी कार्यकारी अभियंता या पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्यकालात त्यांना महाराष्ट्र सरकारतर्फे २०१० मध्ये **उत्कृष्ठ अभियंता,** २०११ मध्ये **महाराष्ट्र निर्माता** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सध्या ते **इंडियन रोड काँग्रेस** या संस्थेवर **सदस्य** म्हणून कार्यरत आहेत. सेवानिवृत्तीनिमित्त त्यांनी मंडळास **रू.११,०००/-** देणगी दिली.






❋ **अनिरूद्ध राजेश गागरे,** रा.वनकुटे यांस **इ.१० वी** मध्ये **७० टक्के** गुण मिळाले.

❋ **कु. ऋतुजा अशोक आवारी,** रा.रांधे हिला **१२ वी सायन्स** मध्ये **८८ टक्के** गुण प्राप्त झाले.



**मराठा समाजासाठी अग्रणी विवाह संस्था**

**बढे मराठा वधू-वर सूचक केंद्र**

**संचालक : प्रा.रावसाहेब बढे** (M.A., B.Ed.)

**मोबाईल - ९७६२०४३६१६, ९६०४१३१०३२**

**विश्वनाथ हौ.सो.बिल्डींग नं.६०/८, दत्त मंदिराजवळ, से.२८, गंगानगर, आकुर्डी, पुणे ४४**

**शाखा - अंबर प्लाझा-बी, एस.टी.स्टँड व ए.डी.सी.सी.बँकेजवळ, अहमदनगर.**

www.badhemaratha.com Email : badhe.raosaheb@gmail.com



# श्री.विजयकुमार ठुबे – बहुआयामी व्यक्तिमत्त्व



श्री. विजयकुमार ठुबे दि.३१.१०.२०१८ रोजी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. आज मागे वळून पाहताना त्यांच्या कौटुंबिक, शासकीय व सार्वजनिक कामाचा घटनाक्रम माझ्या डोळ्यासमोर तरळून गेला.

पारनेर तालुका मित्र मंडळाची स्थापना डिसेंबर १९७९ मध्ये झाली. मंडळाच्या कामात माझा स्थापनेपासून सहभाग आहे. आम्ही काम करीत असताना एकेक कार्यकर्त्यांना जोडीत गेलो. तशातच मे २००३ मध्ये समजले कि, **श्री.विजयकुमार ठुबे** यांची बदली पुण्यामध्ये झाली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल खूप काही ऐकून होतो. असा कार्यकर्ता मंडळाशी जोडला जावा असे आमचे कार्यकारिणीतील सर्वांचेच मत पडले. क्षणाचाही विलंब न करता मी त्यांची भेट घ्यावयाचे ठरविले. पण त्यांच्या एका परिचिताने सांगितले की, त्यांच्याकडे अगोदरच खूप संस्थांची कामे असल्यामुळे त्यांना मंडळाचे काम पाहावयास वेळ मिळेल किंवा नाही अशी शंकाच आहे. ते जर एकदा हो म्हटले तर निश्चितपणे मंडळासाठी वेळ देऊ शकतील व संस्थेला त्यांची मदतच होईल.

त्यावेळेस त्यांनी **अहमदनगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्था** अहमदनगरमध्ये सुरू केली होती. **सदर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तेच होते.** तसेच अहमदनगर शहरामध्ये एक मंगल कार्यालयसुद्धा त्यांनी संस्थेतर्फे बांधलेले होते. याशिवाय **कान्हूर परिसर अभियंता संस्थेची** स्थापना करून परिसरातील गरीब; परंतु हुशार विद्यार्थ्यांना सदर संस्थेतर्फे दरवर्षी आर्थिक मदत देत आहेत. **मराठा वधू–वर संस्था** सुरू करून त्या कामकाजाकडे–सुद्धा त्यांचे लक्ष असे. याशिवाय **मराठा सेवा संघाचे ते सक्रिय प्रमुख कार्यकर्ते** आहेत. आजही या सर्व संस्थांचे कामकाज पूर्वीच्याच उत्साहाने ते करीत असतात. या सर्व संस्थांची उत्तरोत्तर प्रगतीच होत आहे.

**अहमदनगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्था अहमदनगर** या संस्थेचे जाळे त्यांनी संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यात उभारले. सदर संस्थेच्या ६ शाखा अहमदनगर जिल्ह्यांमध्ये आहेत. या संस्थेच्या माध्यमातून अनेक गरजू व्यक्तींना व विद्यार्थ्यांना शैक्षणिक व आर्थिक मदत मिळत असून त्यामुळे लोकांची आर्थिक प्रगती झाली आहे.

मराठा सेवा संघ तर त्यांचा श्वासच ! **आदरणीय पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब** त्यांचे प्रेरणास्थानच. **मराठा सेवा संघाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाची अस्मिता फुलवली. त्याला आकांक्षांचे घुमारे फुटले.** अनेकांना अनेक प्रकारचे सहाय्य मराठा सेवा संघातर्फे केले जाते. संस्थेच्या भरभराटीमध्ये ज्या अनेक व्यक्तींचा हातभार लागला त्यातील एक बिन्नीचे शिलेदार विजयकुमारजीच!

या सर्व बाबी लक्षात घेऊनच मी त्यांची भेट घ्यावयाचे ठरविले. माझ्या मनोदेवतेने मला आश्वस्त केले की, हाडाचा कार्यकर्ता अशा सामाजिक कार्यास नकार देऊच शकत नाही. एके दिवशी मी त्यांच्या कार्यालयात गेलो व माझी ओळख करून देऊन मंडळाच्या कामकाजाबद्दल काही सांगावयाच्या आधीच त्यांनी त्यांना मंडळाबद्दल सर्व माहिती आहे असे सांगितले व मंडळास **रु.५०००/–** ची देणगी दिली. ती तारीख होती १९.०६.२००३. एवढेच नव्हे तर **विद्यार्थी असताना त्यांना मंडळाकडून आर्थिक मदत मिळाली होती हेसुद्धा सांगितले.** त्यांनी सांगेपर्यंत मला माहीतसुद्धा नव्हते की, त्यांना मंडळाने आर्थिक मदत केली होती. '**केवढी ही कृतज्ञता**' !

दुसऱ्याच वर्षी २००४ मध्ये मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये ते सक्रिय झाले. काही व्यक्तींचं व्यक्तिमत्त्वच असे असते की, त्यांच्यामुळे इतरांनासुद्धा स्फूर्ती मिळते. **त्यांचा पहिला आग्रह म्हणजे मंडळास स्वतःची जागा असावी.** त्यासाठी **त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे मंडळाने लवकरच जागा घेऊन वसतिगृह बांधावयाचे ठरविले. श्री. विजयकुमार** व त्यांच्या सुविद्य पत्नी **सौ. सुजाताताई** दोघेही सिव्हिल इंजिनियर असल्यामुळे बांधकामाबाबत त्यांना खडान्‌खडा माहिती होती. **मंडळाने एकमुखाने विजयकुमार यांना बांधकाम समितीचे अध्यक्ष केले.** सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये कार्यरत असल्यामुळे त्यांना सर्व प्रोसिजर ज्ञात होतीच.

सर्वप्रथम त्यांनी १५० पानांची टेंडर नोटीस बारीकसारीक तपशिलासह काढली. निविदा मागवून सर्वात कमी रकमेची निविदा मजूंर केली. बांधकामाची प्रत्येक बारीकसारीक गोष्ट या दाम्पत्याच्या नजरेतून सुटत नसे. थोडी जरी शंका आली तरी लॅबोरेटरीमध्ये टेस्ट केल्याशिवाय बांधकाम पुढे होऊ देत नसत. **इंजि.विजयकुमार ठुबे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाच्या १०,००० स्क्वे.फुटाच्या चार मजली इमारतीचे बांधकाम अतिशय उत्कृष्ट झाले आहे.**

मंडळाची दर महिन्याला कार्यकारिणी सभा असते. कितीही महत्त्वाचे काम असले तरी ते वेळ काढून सभेस येतातच. त्यांच्या उपस्थितीमुळे सभेमध्ये चैतन्य तर येतेच पण अनेक मौल्यवान सूचना ते देत असतात व त्याच्या कार्यवाहीवर जातीने लक्ष ठेवतात. आज वसतिगृहामध्ये १६० विद्यार्थी अत्यंत अल्प दरात राहात आहेत. जाता जाता सांगावेसे वाटते की, विद्यार्थ्यांचे शुल्क ठरविताना त्यांनी कमीत कमी दर ठेवण्याचा आग्रह केला. मंडळ विद्यार्थी वसतिगृह ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवते.

सेवानिवृत्तीमुळे शासकीय सेवेमधील त्यांचे एक पर्व संपलेले आहे. दुसरे पर्व म्हणजे कौटुंबिक जबाबदाऱ्या सुद्धा यशस्वीरित्या पार पाडलेल्या आहेत. तिसरे पर्व जे सामाजिक सेवेचे आहे व जे त्यांच्या बालपणापासून सुरू झाले ते वरील दोन जबाबदाऱ्या संपल्यामुळे आता कुठे बहारण्याचे दिवस आले आहेत. **सौ.सुजाताताईंची** साथ त्यांना मिळतच राहील. **या दांपत्याच्या हातून भरीव सामाजिक कार्य घडो, अशी पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे तर्फे शुभेच्छा!**

**शब्दांकन – हौसाराम घोडके**

# उत्तुंग यशाची विजयगाथा !!!

**बऱ्याच वेळा असं पहायला मिळतं की काही लोक गर्दीबरोबर धावत असतात तर कधी कधी असंही बघायला मिळतं की गर्दीच एका माणसाच्या मागे धावताना दिसते.** असाच काहीसा प्रकार मला दि. ४ नोव्हेंबर २०१८ रोजी अण्णाभाऊ साठे सभागृह, पद्मावती, पुणे या सभागृहात पहायला मिळाला. त्यादिवशी तेथे सार्वजनिक बांधकाम खात्यातील कार्यकारी अभियंता श्री. विजयकुमार ठुबे यांचा शासकीय सेवानिवृत्तीच्या निमित्ताने मराठा सेवा संघाच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी साहेबांशी परिचीत अनेक लोक समारंभासाठी उपस्थित झाले होते. हा इतका दांडगा लोकसंग्रह पाहून एक माणूस आपल्या भोवती कसा व किती गर्दी गोळा करू शकतो हे पाहून आश्चर्य वाटले. संगमनेरहून माझे बालमित्र दिपक पावसे आणि दत्तात्रय बर्कले कार्यक्रमासाठी आले होते. दिपकने आधीच या कार्यक्रमाची कल्पना दिलेली असल्यामुळे मी ही जाण्याचे ठरविले होते. अर्थात माझा व ठुबे साहेबांचा तसा काहीच परिचय नव्हता. याआधी कधी आम्ही भेटलोही नव्हतो. तसा मी या कार्यक्रमात आगंतूकच होतो. पण आमच्या कुठल्याही मित्राला एखादे आमंत्रण असेल तर अशा कार्यक्रमाला आपण जावे की नाही असा प्रश्न आम्हाला कधीच पडत नाही. मित्र जाणार असतील त्या कार्यक्रमाला हजेरी लावायला आमची काहीच हरकत नसते. आमंत्रणाशिवाय जाणे कितपत बरोबर आहे हे काही आम्हाला कळत नाही. पण आम्हाला त्यात काही कमीपणा वाटत नाही. आणखी एक स्वार्थ असा असतो की मित्र भेटले की काही पळभर गप्पा मारता येतात आणि कार्यक्रमाच्या निमित्ताने वेळ ही सत्कारणी लावता येतो व कधी कधी अशा कार्यक्रमांमधून खूप काही प्रेरणा व उर्जा मिळते.




सकाळी दहा वाजल्यापासूनच लोकांची गर्दी जमायला सुरूवात झाली होती. सभागृहाच्या दरवाज्यात सुरेख रांगोळी काढली होती. हलकेसे मधूर संगीत ऐकू येत होते. आयोजकांची लगबग पहायला मिळत होती. कार्यक्रम विनाअडथळा पार पडावा म्हणून कार्यकर्ते व स्वयंसेवक अविरत धडपडत होते. सकाळी साडेदहाचे सुमारास मी कार्यक्रम स्थळी पोहचलो. जिव्हाळा परिवाराचे सदस्य आणि आमचे मित्र इंजि.श्री. बाळासाहेब डेंगळे यांची तेथे भेट झाली. त्याचवेळी सभागृहाच्या समोरील भागात उपस्थित सहकारी आणि मित्रपरिवार ठुबे साहेबांची भेट घेत होते. साहेबांची ठेंगणी पण अतिशय प्रसन्न व हसरी मुर्ती पाहून पहिल्याच भेटीत त्यांच्याबद्दल प्रेम आणि आदर वाटायला लागला.



कार्यक्रमाची सुरूवातही त्यांच्या जीवनपटावरील घटनांची माहिति देणाऱ्या चित्रफीतीने झाली होती आणि त्यांच्याबद्दलची माहिती मनःपटलावर जमा व्हायला सुरूवात झाली. कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. रविवार सुट्टीचा दिवस असूनही उपस्थितांची संख्या लक्षणीय होती. अनेक लोक लांबच्या ठिकाणाहून आले होते. कार्यक्रम सुरू झाला आणि नंतरचे चारपाच तास अतिशय मंतरलेले गेले. संयोजकांनी कल्पकतेने कार्यक्रमाची मांडणी केल्यामुळे समारंभ अतिशय दिमाखदार झाला. खचाखच भरलेले सभाग्रह उत्स्फुर्तपणे साहेबांच्या प्रशासकीय सेवानिवृत्ती निमित्त कार्यक्रमात आकंठ बुडून गेले.

कार्यक्रमाचा वृतांत अनेक लोकांच्या माध्यमातून आपणाला कळेलच. त्याबद्दल मी फार काही लिहिणार नाही. पण एक त्रयस्थ म्हणून कार्यक्रमा दरम्यान अनेक वक्त्यांनी केलेल्या भाषणातील मला भावलेले काही प्रसंग व काही अतिशय सकारात्मक शब्दांचा उहापोह करण्याचा प्रयत्न करणार आहे. यापुर्वी या रंगमंचावर अनेक कसलेल्या कलाकारांचा अभिनय पाहून विनोदी किंवा हृदयद्रावक प्रसंगा दरम्यान प्रेक्षक हसले असतील किंवा रडले असतील. पण कालच्या साहेबांच्या गौरवपुर्ण भाषणात आलेले आमंत्रित कोणत्याही अभिनयाशिवाय उत्स्फुर्तपणे हसत होते आणि काही प्रसंगी त्यांचे डोळे आपसूक घळघळ वाहत असलेले पहायला मिळाले. हासू

आणि आसू यांचे अनोखे मिश्रण तिथे अनुभवायला मिळाले.

सगळयाच वक्त्यांची भाषणे अतिशय सुरेख झाली. साहेबांच्या आयुष्यातील अनेक घटनांवर प्रकाश टाकल्याचे जाणवत असताना त्यांनी केलेल्या प्रगतीचा आलेख नजरेसमोर आला. कोणीतरी म्हणालं की **ज्या भागामध्ये निसर्ग अतिशय प्रतिकुल असतो व जेथे जगण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात त्या भागातील मुले शैक्षणिक क्षेत्रात व त्यानंतर नोकरी व्यवसायात आपल्या कठोर परिश्रमाने यशस्वी झालेली बघायला मिळतात.** अर्थात ज्या झाडांना जवळपास सहजासहजी पाणी मिळत नाही त्या झाडांची मुळे पाण्यासाठी खोलवर जातात आणि त्यामूळेच ती मुळं खुप सशक्त झाल्याने ती झाडे अतिशय ताकदवान होतात व कसल्याही वादळवाऱ्यात डगमगत नाहीत व जमीनदोस्तही होत नाहीत.

श्री. विजयकुमार ठुबे साहेब हे पारनेर तालुक्यातील दशाबाईच्या पायथ्याच्या कान्हूर पठार या दुष्काळी गावातून आल्यामुळे त्यांनी शिक्षणाचा ध्यास घेतला. **आपल्या अंगभूत हुशारी व चिकाटीमुळे शाळा कॉलेजात दैदिप्यमान यश संपादन करून पुढे ते शासकीय क्षेत्रात नोकरी मिळवून यशस्वी झाले.** शासकीय सेवेदरम्यान स्वतःच्या कामाशी प्रामाणिक राहून व वरिष्ठांचे कोणतेही दडपण न घेता त्यांनी गोरगरीबांसाठी काम केले. ते करत असताना त्यांनी शासकीय कामाबरोबरच अनेक गरजू लोकांना वैयक्तिक स्वरूपात मदत केली परंतू मदत करताना कोणत्याही स्वरूपातील परतफेडीची अपेक्षा ठेवली नाही. त्याचबरोबर ते मराठा सेवा संघाच्या सामाजिक कार्यातही सक्रीय राहिले.

त्यांच्याबाबतीतला ‘वरच्याला लाथा आणि खालच्याला माथा’ हा शब्दप्रयोग मला खुपच क्रांतीकारक वाटला. हा विचार तसा सरकारी क्षेत्रात विरोधाभासच आहे. अशा प्रकारचा विचार करणारी अधिकारी मंडळी अगदीच विरळ. हा विचार जर सगळयाच शासकीय विभागांमध्ये रूजला गेला तर गरजू लोकांची कामे पटापट होतील. त्यांना होणारा मनःस्ताप कमी होईल. त्याने रामराज्य येईल की नाही माहीत नाही पण देशातला प्रत्येक नागरीक नक्कीच समाधानी होईल. व त्याचा शासनावरचा विश्वास वाढीस लागेल. तसेच यामुळे शासकीय सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची उत्पादकता वाढेल आणि जनसामान्यात त्यांची विश्वासार्हता उंचावेल.

साहेबांबद्दल कळलेला अजून एक शब्द म्हणजे **‘फाटका’** – साहेब अतिशय सडेतोड आणि स्पष्टवक्ते आहेत असे कळले व म्हणूनच ते फाटके असावेत. त्याच्याच जोडीला आलेला वाक्यप्रचार म्हणजे जो फाटका असतो तोच नेटका असतो. वा! क्या बात है! खरोखरच ज्याच्या काळजात सत्य आहे. ज्याच्या वाणीत पारदर्शकता आहे.ज्याच्या देहबोलीत सच्चेपणा आहे असा व्यक्तीच नेटका असू शकतो व इतर स्वार्थी लोकांना तो फाटका वाटू शकतो. परंतू आजच्या ठुबे साहेबांच्या सेवानिवृत्ती समारंभाच्या उत्स्फुर्त गर्दीने हे दाखवून दिले आहे की, प्रामाणिक माणसाच्या शाब्दिक फटकाऱ्यांवरही लोक प्रेम करतात.

साहेबांच्या शिस्तीबद्दल त्यांच्या मुलांच्या भाषणामधूनही जाणवत होते. आपल्या पित्याबद्दल आदरयुक्त भिती असल्यामुळे ती आज सुसंस्कारीत होऊन नोकरी व्यवसायात यशस्वी झाली आहेत. चि.श्रेयस व श्री. प्रतिक या दोन्हीही मुलांच्या मनोगतात आईवडीलांबद्दलचे अलौकीक प्रेम दिसत होते. त्यांच्या भाषणातील अनेक शब्दांनी काळजाचा ठाव घेतला होता. नकळत अनेक वेळा डोळयांच्या कडाही ओल्या झाल्या होत्या. दोघांच्याही शब्दातील साधेपणा. आईवडीलां–बद्दलची कृतज्ञता तसेच समस्त ठुबे परिवाराबद्दलची ओढ व




आत्मियता त्यांच्या भाषणातून सतत जाणवत होती. दोघांच्याही मनोगता दरम्यान साहेब आणि सौ.सुजाताताईंना भरून आले असेल व आपण अशा आज्ञाधारक मुलांचे आईवडील आहोत याबद्दल त्यांना कृतकृत्य वाटत असेल व तसे समाधान दोघांच्याही चेहऱ्यावर दिसत होते. भाषणाच्या शेवटी श्रेयसने वडीलांना मुन्नाभाईच्या थाटात दिलेली असाधारण भेट म्हणजे जादूची झप्पी. वडीलांना काय प्रेझेंट द्यावे असा प्रश्न पडलेला असताना त्याने व नंतर प्रतिकनेही वडीलांना दिलेले आश्वासक आलिंगन हे कोटयावधी रक्कमेच्या भेटीपेक्षा अनमोल आहे. जादूच्या झप्पीची कल्पना सुचल्याबद्दल श्रेयसच्या कल्पकतेला खरंच आमचा मानाचा मुजरा!

आसामच्या पोलीस दलात अधिक्षक पदावर असलेल्या प्रतिकनेही आपल्या भाषणाने सर्वांची मने जिंकली. इतक्या

लहान वयात इतकी मोठी समज पाहून आश्चर्यच वाटले. इतकं संयमित आणि काळजाला भिडणारं भाषण खूप दिवसांनंतर ऐकलं. भाषणाची सुरवातही अतिशय साधेपणाने करताना दळण आणण्याचा घरगुती प्रसंग व घरातली कामे करताना देखील वडीलांचा धाक या गोष्टी अतिशय जिव्हाळयाने मांडल्या आहेत. त्याचबरोबर आपल्या यशाचे श्रेय आईला द्यायलाही तो विसरला नाही. 'माँ-बापसे बेटे सवाई' ही म्हण दोघांनीही सार्थ करून दाखविली. अशा मुलांचे आपण आईवडील आहोत याचा सार्थ अभिमान दोघाही मातापित्यांना वाटल्यावाचून राहीला नसेल. कालचं प्रतिकचं अतिशय वास्तवपुर्ण भाषण अनेक होतकरू मुलांना मार्गदर्शक ठरू शकेल. ते संकलित करून कायमस्वरूपी यू-ट्यूब वर ठेवलं तर त्यातून अनेक मुलं आपल्या भविष्यासाठी त्यातील तत्वांचा अंगीकार करू शकतील.

संसाररूपी रथाचं दुसरं चाक म्हणजे पत्नी **सौ. सुजाताताई ठुबे** यांनी स्वतः इंजिनियर असूनही आपल्या करीयरचा विचार न करता साहेबांना समर्थपणे साथ देत त्यांचा संसार आणि मुलांचे योग्य संगोपन करण्याला प्राधान्य दिलं. त्या स्वतःला हाऊसवाईफ म्हणण्यापेक्षा होममेकर म्हणणे जास्त पसंत करतात. जिजाऊसाहेबांच्या थोर जीवनाचा आदर्श घेऊन त्यांनी शिवाजी राजांना ज्या पध्दतीचे संस्कार दिले त्याप्रमाणेच आपल्या मुलांना संस्कार देवून ताईंनी वाढवलं. त्यांच्या सुयोग्य संस्कारामुळे आणि साहेबांच्या आदरयुक्त भितीमुळे मुले निव्यसनी निपजली. कर्तबगार झाली व आपापल्या करीयरमध्ये यशस्वी झाली. आईने केलेले संस्कार आणि वडीलांचे शासकीय नोकरीत असलेले स्थान व सामाजिक कार्याचा त्यांचा वारसा मुलांमध्ये आपोआपच आला. जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आणि यशस्वी होऊनही साधेपणाने वागणे हा साहेबांचा स्वभावगुण मुलांनीही



उचलला हे खरंच कौतुकास्पद आहे. भाषणादरम्यान कोणीतरी म्हणालं की साहेबांपेक्षा **सौ. सुजाताताईंचं** संसारातला सहभाग इतका मोठा आहे की साहेबांनी त्यांचे पाय धरले तरी वावगे होणार नाही. साहेबांनीही निःसंकोचपणे आपल्या भाषणावेळी पत्नीला समोर येण्याचे आवाहन केले व सर्वांसमक्ष पाय धरण्याची तयारी दाखवली. आजच्या पुरूषप्रधान संस्कृतीत हा अनुभव तसा विरळाच नाही का? पण साहेबांनी येथे स्त्रीस्वातंत्राचे आणि आपल्या थोरपणाचे उदाहरण सादर केलं. कोणत्याही स्त्रीला एकांतात किंवा लोकांसमोर आपल्या पतीने आपले पाय धरावे हे कदापी रूचणार नाही व ताईंनीही या मागणीचा अव्हेर करून आपल्या घरंदाज संस्कारांचा परिचय करून दिला.

या संपूर्ण कार्यक्रमामध्ये त्यांचे आप्तेष्ट व मित्रांनी ठुबे साहेबांच्या आयुष्याशी निगडीत असलेल्या आठवणी जागवल्या व हा एकमेव कार्यक्रमाचा शिखरबिंदू होता. जेवणाची वेळ टळून गेल्यानंतरही शब्दांची मेजवानी सोडून जायला कोणाचेच मन धजावत नव्हते हीच या मैफिलीच्या यशस्वीततेची गुरूकिल्ली आहे. अतिशय मिश्कील आणि खुसखुशीत शब्दांची पेरणी करत अनेक मान्यवरांनी ही



संवादिनी चांगलीच रंगविली. ठुबे साहेबांच्या खासदार मित्राने आपल्या शैक्षणिक प्रक्रीयेवर आणि राजकीय व्यवस्थेवर अतिशय मार्मिक टिपण्णी केली. त्यांच्या शालेय जीवनात ठुबे साहेव अव्वल नंबराने व त्यांचे खासदार मित्र थोडया खालच्या नंबरावर पास होत असत. म्हणून त्यांनी सांगीतले की विजय एक नंबरने पास व्हायचा त्यामुळे पुढे तो शासकीय अधिकारी बनला आणि मी कमी मार्कांने पास व्हायचो म्हणून खासदार झालो. हे व्यावहारीक व्यंग सांगताना आपल्या राजकीय व प्रशासकीय कार्यपध्दतीतील विषमतेवर त्यांनी चपखल बोट ठेवले आहे. त्याचबरोबर त्यांनी हे ही सांगीतले की शाळेत असताना दहावीपर्यंत कोणाची काय जात आहे हे न कधी कळालं ना त्याची कधी गरज वाटली. हा सर्वधर्म समभावाचा मंत्र प्रत्येक शाळेत नकळत जोपासला जायचा. **शिवदास जाधव महाराज** यांनीही आपल्या नर्मविनोदी पध्दतीने समाजाच्या अनेक अंधश्रध्दांवर विनोदी अंगाने भाष्य करून उपस्थितांना प्रबोधन केले.

मराठा सेवा संघाचे सर्वेसर्वो **श्री. पुरूषोत्तम खेडेकर** यांचे प्रखर आणि तेजस्वी विचारही सभाग्रहाला आवडले. मराठा सेवा संघाची तत्व सांगताना जाती व्यवस्थेवर त्यांनी प्रहार केले. पण त्याचबरोबर प्रत्येक जातीचा आपण आदर केला पाहिजे हे सांगायलाही ते विसरले नाहीत. अतिशय स्पष्टवक्तेपणा असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. सर्व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जमा केलेल्या २० लाखांच्या रक्कमेची भेट न स्विकारता आपल्या कुटुंबियांतर्फे त्यात ५ लाख घालून ठुबेसाहेबांनी ही सर्व रक्कम मराठा सेवा संघाच्या कार्याला अर्पण केली. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात साहेबांवरील त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी व मित्रपरिवाराने लिहिलेल्या ह्दयस्पर्शी आठवणींच्या लेखांचे एकत्रित संकलन करून पुस्तकाच्या रूपात ''**विजयगाथा**'' या नावाने प्रकाशित केले गेले. त्यामध्ये जवळजवळ १४० मान्यवरांनी आपली मनोगते मांडली आहेत. हे ५०० रूपये किमतीचे पुस्तक कार्यक्रमासाठी आलेल्या सर्वांना विनामुल्य भेट देण्यात आले. शेवटी कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतरही साहेबांचे आप्तेष्ट व मित्रपरिवार त्यांचा सत्कार करण्यासाठी गर्दी करत होते. साहेबांचा सत्कारसमारंभ म्हणजे आपलाच सत्कार असे प्रत्येकाला वाटत असावे. दूपारचे चार वाजल्यानंतरही कोणाला भूकेची आठवण होत नव्हती की जेवणासाठी पावले भोजनकक्षाकडे वळत नव्हती. एकंदरीत हा चार तासांचा कार्यक्रम अतिशय संस्मरणीय ठरला.

**नोकरी किंवा व्यावसायिक प्रगतीनंतर आयुष्याच्या उत्तरार्धात एका वळणावर आपण सामाजिक जाणीव मनामध्ये ठेवून समाजाचं देणं परत करण्यासाठी उभं राहीलं पाहिजे** हा फार मोठा संदेश घेऊन प्रेक्षक हळूहळू सभाग्रहाच्या बाहेर पडत होते. मन बिलकूल हलकं हलकं झाल्याची जाणीव प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होती. एक अतिशय ह्दयस्पर्शी समारंभाचे भागीदार झाल्याची अनुभूती घेऊन मोठया समाधानी वृत्तीने सगळे बाहेर पडत होते. अशा प्रकारचे घरगुती कार्यक्रम मन व शरीर नकळत स्वच्छ करत असतात असे मला वाटते. अशा कार्यक्रमात शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढविण्याची संजीवनी असते असा मला दृढ विश्वास आहे व त्याचा प्रत्येकाच्या मनावर व शरीरावर सकारात्मक परिणाम दिसून येतो. म्हणून असे कार्यक्रम आयोजित केले पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्याबरोबर आपल्या कुटुंबाला आणि मुलांनाही अशा कार्यक्रमांना सहभागी करून घेतले पाहिजे. त्यातून त्यांनाही समाजाला धरून राहण्याची शिकवण मिळेल. आपण आपले वय आणि नोकरी व्यवसायातील स्थान विसरून त्यात सहभागी झाले पाहिजे जेणेकरून शरीर व मनावरचे दडपण कमी होण्यास नकळत मदत होईल. शेवटी इहलोकीचा प्रवास संपताना आपला आत्मा तृप्त व समाधानी होऊन पंचतत्वात विलीन व्हावा असं कोणाला वाटणार नाही.

मी ठुबे साहेब, त्यांच्या पत्नी सौ.सुजाताताई आणि त्यांच्या सर्व कुटुबियांना मनःपुर्वक शुभेच्छा देतो.

**शब्दांकन – अनिल भोंगळे, पुणे**


# नाथ एलिव्हेटर्स

Nath ELEVATORS

**इमारतींच्या लिफ्टचे मॅन्युफॅक्चरर्स**

- Manufacturer of Elevators,
- Installation Commissioning &
- Maintenance of all type of Lifts.

Prop. : Y.D.Bhusare Patil
Cell : 9890909945
9552528284

S.No.4/1+2, Narsiha Colony, Next to Balaji Law College, Thathwade, Pune - 411033.
Tel. : (O) 020-65104322 E-mail : nath.elevatorspune@gmail.com

# मला असे घडविले.... इंजि. विजयकुमार ठुबे

कर्तृत्व पारनेरकरांचे



कै.रेऊबाई ठुबे कै.गोविंदराव ठुबे

दि. १८ फेब्रुवारी २०१० रोजी मुंबई प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरात सकाळी अकरा वाजता हजर झालो. मी व माझे कुटुंब, नातेवाईक, मित्रांबरोबर इतरही बरीच कुटुंबे हळूहळू जमा होऊ लागली. शासकीय कार्यक्रम असल्याने मंद आवाजात सनई सुरू झाली होती. थोड्याच वेळात महाराष्ट्र शासनातील जवळपास दहा मंत्रीगण सभागृहात उपस्थित झाले. ठरलेल्या वेळी **महाराष्ट्राचे मा. राज्यपाल शंकर नारायण** विचारमंचावर विराजमान झाले. **मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री व इतर मंत्र्यांच्या उपस्थितीत शासनाच्या सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा व जीवन प्राधिकरण या विभागातील काही ठराविक अभियंत्यांना 'उत्कृष्ट अभियंता' पुरस्कार देण्याचा कार्यक्रम सुरू झाला.** समाजातील अभियंत्यांचे राष्ट्रीय व राज्यपातळीवर असलेले योगदान यावर भाषणे सुरू झाली. त्यावेळी आपणही एक अभियंता असल्याचा कोण अभिमान वाटला. काही वेळातच माझे नाव पुरस्कारासाठी जाहीर झाले व **मला राज्यपालांचे हस्ते 'उत्कृष्ट अभियंता' पुरस्कार प्रदान करण्यात आला.** पुरस्कार स्विकारताना मला झालेला आनंद शब्दांत व्यक्त करू शकत नाही. आयुष्यातील बरीच वर्षे कठीण प्रवासातून निरपेक्ष भावनेने काम केल्यानंतरच हा पुरस्कार प्राप्त झाल्याने मन तृप्त झाल्याचे जाणवले. हा पुरस्कार आपणांस सहजासहजी मिळाला नसल्याचीही जाणीव त्यावेळेस झाली. त्याचबरोबर अधिकार हे सेवा म्हणून वापरल्यास त्याची शासन दरबारीही नोंद घेण्यात येते हेही जाणवले. पुरस्कार घेतल्यानंतर कार्यक्रम सुरू असतानाच मनामध्ये मी सिंहावलोकन करू लागलो व मन गतकाळामध्येच गेले.

पारनेर तालुक्यातील कान्हुर पठार माझे गाव. असे म्हणतात की, महाराष्ट्रातील सर्वांत उंच कळसूबाई शिखरच्या खालोखाल आमच्या कान्हूरमधील दशाबाई डोंगराची उंची आहे. पठार भागावरील एका खोलगट भागामध्ये माझे गाव वसलेले. या भागामध्ये एक तर दुष्काळ किंवा तीव्र दुष्काळ; शेतजमिनीचा कस मात्र अतिशय उत्तम. माझे कान्हूरच्या राजवाड्यासमोरील धाब्याचे खणाचे घर. घराच्या मध्यभागी मोठा चौक. तेथे घंगाळामध्ये आंघोळ करताना मजा वाटायची. खाऊन-पिऊन सुखी कुटुंब. आजोबा पूर्ण शेतकरी. शिक्षण नाही पण आजोबा व्यवहारात अतिशय हुशार. त्यांना लोक 'सखा भांड्या' म्हणायचे. शिक्षण नसले तरी कोर्टाच्या कामात नेहमी अग्रेसर. आजही १९१० सालातील एका कोर्ट केसची मोडीतील कागदपत्रे आमच्या कपाटामध्ये उपलब्ध आहेत. एका जमिनीचा वाद किती वर्षे कोर्टामध्ये चालू शकतो याचे ते उत्तम उदाहरण. वडील मला म्हणाले की, तुझ्या आजोबांनी सुरू केलेला हा दावा मी चालू ठेवला व माझ्यानंतर तूही चालव. मी त्यांना म्हटले इतक्या वर्षात तुम्ही जमिनीच्या किमतीपेक्षा जास्त रक्कम फक्त वकिलांनाच दिली असेल. त्याचा काय फायदा आपल्याला झाला? तुम्ही आम्हाला एवढे शिकवले त्याचा उपयोग आता भांडण करण्यापेक्षा भांडण मिटविण्यासाठी करू. मी खरोखर त्यानंतर त्याबाबतचा वाद तेथेच मिटवला व १०० वर्षांनंतरही सुरू असलेला दावा बंद करून टाकला.



खाऊन पिऊन सुखी असलेल्या घरामध्ये माझा जन्म झाला. वडील कै. गोविंदराव सखाराम ठुबे हे स्वतःच शेती करता करता शिकले. त्याकाळी मॅट्रिक झाले व प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीत हजर झाले. शेती व नोकरी दोन्हीमध्ये मन लावून काम करीत होते, हे मला आजही आठवते. माझ्या घरी भाऊ व रभाजी या नावाचे सालगडी होते. बैलही होते. मी स्वतः विहिरीवर मोटेने पाणी भरले आहे. आमच्या कुटुंबाच्या वाट्याला दरवर्षी चाळीस पोती आंबे यायचे. आंबे खाण्यासाठीही रेलचेल असायची. आम्ही एकूण सात भावंडे! आमची आई रेऊबाई. त्या काळची इयत्ता सातवी झालेली. खरंतर आईसुद्धा शिक्षिका म्हणून नोकरीला लागली असती. पण कदाचित खटल्याच्या घरात असल्यामुळे नोकरी केली नसावी. आमच्या वडिलांना तीन भाऊ, तीन बहिणी, मोठे बंधू अशिक्षित. वडिलांनी त्यांच्या पाठीवरील दोन्ही बंधूंना शिकविले. त्यामुळे दोन्ही चुलत्यांचे वारसदार सुशिक्षित झाले. घरामध्ये एक व्यक्ती जरी शिकली तरी त्यानंतरच्या व्यक्ती शिकतात, याचे हे चांगले उदाहरण. आई आमची अतिशय प्रेमळ पण कठोर. स्वच्छतेची अतिशय आवड. आईच्या वडिलांचे त्याकाळी मुंबईला लालबागला नारळाचे दुकान होते. मी बऱ्याच वेळा माझ्या आजोळी म्हणजे बाभुळवाडे या गावी कान्हूर पठारहून पायी जायचो. लहानपणी कोणतेही वाहन नसल्याने पायी किंवा बैलगाडीशिवाय पर्याय नव्हता. माझ्या आजोळी आजोबांचे नाव 'बाळाजी खणकर.'

कान्हूरला इयत्ता तिसरीपर्यंत शाळा होती. आमच्या शाळेच्या इमारतीला 'खिडकीची शाळा' म्हणत. अहिलाजी काकडे हे आमचे वर्गशिक्षक अतिशय कडक, त्यांची शिस्त, मी आजही विसरू शकत नाही. माझ्या वडीलांची कान्हूरहून पारनेरला बदली झाली. त्यामुळे आमचे कुटुंबही पारनेरला स्थलांतरित झाले. त्यामुळे माझी अर्धी तिसरी कान्हूरला व अर्धी तिसरी व चौथी पारनेरला झाली. आम्हाला दुधाडे गुरुजी वर्गशिक्षक होते. **त्याकाळचे शिक्षक म्हणजे अतिशय शिस्तप्रिय, वक्तशीर व हाडाचे शिक्षक ! त्यांचा दराराही वेगळाच !**

इयत्ता चौथीत गेल्यानंतर माझे वडीलच मला वर्गशिक्षक म्हणून लाभले. मला खूप आनंद वाटला. एकदा वर्ग चालू असताना सर्व मुलांसमोर मी त्यांना 'गुरुजी' म्हणण्याऐवजी 'तात्या' म्हणालो. आम्ही घरी वडिलांना तात्या म्हणायचो. त्यावेळी 'तात्या' म्हटलो म्हणून त्यांनी सर्व मुलांसमोरच माझी पिटाई केली. माझा गालही लाल झाला. त्यावेळेपासूनच शाळेमध्ये माझे वडील हे वडील नसून शिक्षकच असतात याची जाणीव झाली. कडक शिस्त काय असते हे बालवयातच मला कळाले. त्याचा परिणाम मीच नाहीतर वर्गातील इतर मुलांवरही झाला. **शिस्तीच्या बाबत संपूर्ण तालुक्यामध्ये माझ्या वडिलांचा दरारा होता!**

वडील पहाटेच उठवून माझा अभ्यास घ्यायचे. त्याकाळी इयत्ता चौथीमध्ये स्कॉलरशिप व पब्लिक स्कूलची स्पर्धात्मक परीक्षा असायची. मला परीक्षेला बसवायचे म्हणून बहुतेक वडिलांनी माझा वर्ग घेतला असावा. कठोर परिश्रम घ्यायची सवय मला

बालपणामध्येच आईवडीलांनी लावली. १९६९ साली मी चौथी पास झालो. **स्कॉलरशिपमध्ये माझा जिल्ह्यामध्ये पहिल्या तीनमध्ये नंबर आला.** त्याकाळी शासनाने महाराष्ट्रात चार शासकीय विद्यानिकेतने स्थापन केली होती. त्यापैकी अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव, ठाणे व कुलाबा या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी नाशिक येथे शासकीय विद्यानिकेतन सुरू केले होते. या सहा जिल्ह्यातील एकूण नऊ-दहा हजार विद्यार्थ्यांमधून पहिले तीस विद्यार्थी परीक्षेमधून निवडले जात व शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा सर्व खर्च शासन करते. **या परीक्षेमध्ये माझा १२ वा नंबर आल्यामुळे दि.६ जून १९६९ रोजी नाशिक येथील शासकीय विद्यानिकेतन मध्ये प्रवेश घेतला.** पारनेर येथे शिकत असताना डोक्यावर टोपी घालणारा विद्यार्थी, खाकी पॅन्टच्या आत अंडरपॅन्ट असते हेही माहीत नसणारा विद्यार्थी शासकीय विद्यानिकेतनमध्ये प्रवेश घेतल्यानंतर एकदम बदलला. आज माध्यमिक शाळांचा जो दर्जा आहे, तो आम्ही पन्नास वर्षांपूर्वीच प्रत्यक्ष अनुभवला आहे. शैक्षणिक सुविधा, खाण्यापिण्याची पूर्ण चंगळ, भरपूर व्यायाम, शिस्त, हाडाचे शिक्षक या सर्व बाबतीत आम्ही सुदैवी होतो. खऱ्या अर्थाने नीतीमूल्यांचे, समूहजीवनाचे शिक्षण आम्हाला या शाळेने दिले. त्याची परतफेड आम्ही जन्मात करू शकत नाही. नाशिक शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर गोदावरी नदीपासून हाकेच्या अंतरावरील गंगापूर धरणाच्या रस्त्यावरील उदोजी मराठा बोर्डिंगच्या इमारतीमध्ये आमची शाळा होती.

आमचे शिक्षकही फारच उत्तम दर्जाचे शिक्षण आम्हाला द्यायचे. दरवर्षी एखाद्या विषयात तरी शाळेचा विद्यार्थी बोर्डामध्ये पहिला यायचा. **मीही इयत्ता दहावीच्या बोर्डामध्ये पहिल्या ५० विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीमध्ये चमकलो.** त्याकाळी बोर्डामध्ये गुणवत्ता यादीमध्ये येणे ही फार मोठी बाब गणली जायची. पण ग्रामीण भागातील विद्यार्थी असल्याने त्याची म्हणावी अशी दखल ना घरच्यांनी घेतली, ना शाळेने घेतली. मलाही त्याचा अवेरनेस नसल्याने काही वाटले नाही.

आम्ही घरी एकूण सात भावंडे! एका प्राथमिक शिक्षकाची एवढ्या सर्वांना शिकविण्याची आर्थिक ताकद नव्हतीच. तरीही सर्व मुलांना चांगले, सक्षम शिक्षण द्यायचे ही आई-वडिलांची इच्छाशक्ती ! त्यामुळे घरची परिस्थिती काटकसरीची होती. माझी आई गाय, कोंबड्या पाळत असे. रानामध्ये गवत आणायला जायची. घरातील परिस्थितीची कोणतीही झळ माझ्यापर्यंत पोहोचत नव्हती.

दहावीनंतर तुमचा मुलगा हुशार आहे, त्याला नगरला ठेवा असे लोकांनी सांगूनही केवळ आर्थिक भार सोसणार नाही म्हणून पारनेरलाच नवीन उघडणाऱ्या 'उच्च माध्यमिक विद्यालयात' मला टाकण्याचा निर्णय आईवडीलांनी घेतला. त्यामुळे पारनेर येथील सेनापती बापट विद्यालयामध्ये माझी अकरावी झाली. त्यावेळी **आदरणीय चोरडिया सर, भारदे सर, पांढरे सर, वेदपाठक सर, देशमाने मॅडम हे माझे शिक्षक होते. त्यांच्याबद्दल मी आजही कृतज्ञ आहे.** अकरावीनंतर आवश्यक तेवढी विद्यार्थ्यांची संख्या नसल्याने पारनेरला बारावी बंद पडली व नाईलाजाने मला नगरला ॲडमिशन घ्यावी लागली. माझे मोठे बंधू श्री. वसंतराव हे एमएस्सी नंतर बी.एड. साठी नगरला होते. त्यांनी मला 'अहमदनगर कॉलेज'ला प्रवेश घेऊन दिला व माझा अभ्यासही घेतला. **बारावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळाल्याने मला पुण्याच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाला.**



*मा.इंजि.विजयकुमार ठुबे यांचा सत्कार करताना डावीकडून ना.अजितदादा पवार, मुख्यमंत्री अशोक चव्हाण, राज्यपाल शंकर नारायण, ना.रामराजे निंबाळकर*

बालपणातच मला नेतृत्वगुणांचा विकास करण्याची संधी मिळाली. १९६९ साली सेनापती बापटांची जयंती होती. त्यावेळी **भाषण स्पर्धेमध्ये मला पहिले बक्षीस मिळाले.** शासकीय विद्यानिकेतनमध्ये मी स्कूल मॉनिटरही होतो. **त्याच पार्श्वभूमीवर मला इंजिनिअरिंग कॉलेजमध्येही नेतृत्व करण्याची संधी मिळाली** व मीही त्याचा फायदा घेतला. मला जिद्द, चिकाटी, सकारात्मक विचार, तळागाळातील जनतेबद्दल सहानुभूती तसेच इच्छाशक्ती, प्रामाणिकपणा इत्यादीबाबतचे योग्य संस्कार प्रथमतः माझे आईवडील यांनी बालपणामध्येच केले व त्यानंतर माझ्या शासकीय विद्यानिकेतनने ! **शाळेमध्ये प्राचार्य भ. बा. सिंगम सर, बोर्डेसर, विसपुते सर, ईशी सर, बेरड सर, पंचाक्षरी सर, जाधव मॅडम या शिक्षकांनी वरील संस्कार मनावर ठसविले.** माझे हस्ताक्षर चांगले करण्यासाठी बोर्डेसरांनी कष्ट घेतले.

इंजिनिअरिंग कॉलेजमधून मी सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये पदवी घेतली. त्यावेळी कोणती शाखा घ्यावी, याचेही मार्गदर्शन कोणाकडून मिळत नव्हते. माझ्यासमोर त्यावेळी आमच्या गावाजवळील 'पानोली' या गावचा पंढरीनाथ शिंदे हा विद्यार्थी माझ्यापुढे एक वर्ष होता, त्याने फर्स्ट क्लास मिळवूनही सिव्हिल ब्रँच घेतली होती. तो माझा आदर्श असल्याने मीही सिव्हिल ब्रँच घेतली. आज मला सामाजिक कार्य करताना या ब्रँचचा प्रचंड प्रमाणात फायदा झाला आहे.

**इयत्ता पाचवीपासून माझ्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च शासनानेच केला आहे. माझ्या कुटुंबावर कोणताही आर्थिक भार आला नाही. पाचवी ते दहावी शासकीय विद्यानिकेतनमध्ये शिक्षण, अकरावी व बारावीला पब्लिक स्कूल स्कॉलरशिप मिळाली. इंजिनिअरिंग कॉलेज शासकीय असल्याने ट्युशन फी, होस्टेल फी माफ होती व स्कॉलरशीपही होती. त्यामुळे आपण नैपुण्य दाखविले व संधीचा फायदा घेतला तर शासन भक्कमपणे आपल्या पाठीशी उभे राहते असा अनुभव मी घेतला आहे. त्यामुळे आपण शासनाचे देणे लागतो. पर्यायाने समाजाचे देणे लागतो ही भावना माझ्यामध्ये कॉलेज लाईफमध्ये रुजली गेली.**

कॉलेजमध्येच असताना मी मोठे व्यावसायिक होण्याचे स्वप्न पाहिले. माझ्या घरातील वातावरण अतिशय सुसंस्कृत, शैक्षणिक, सकारात्मक होते. त्यामुळे आपण मोठा व्यवसाय करून आपल्या आईवडिलांचे, घराण्याचे नाव मोठे करावे असे वाटे. त्यामुळे इंजिनिअरिंग सुटल्यावर काही दिवस खाजगी कंपनीमध्ये अनुभव घ्यावा. परदेशामध्ये जाऊन यावे व आपल्या स्वतःचा खासगी

व्यवसाय सुरू करावा असे ठरविले. पण नियतीने वेगळेच ठरविले होते.

त्यावेळेस घरामध्ये सर्व भाऊ-बहिणींचे शिक्षण चालू होते. वडील बंधूंचे पदव्युत्तर शिक्षण, बहिणी डी.एड्. कॉलेजमध्ये, लहान बंधू मेडिकल कॉलेजमध्ये असल्याने वडिलांनी जमिनीही विकल्या होत्या. बरेच कर्ज झाले होते. त्याची परतफेड करणे आवश्यक होते. वडिलांच्या व आईच्या पुढे एक मोठे आव्हान होते. मी परदेशात गेलो तर आपला एक मुलगा हातचा निघून जाईल. तो परदेशात गेला तर परत येणार नाही, तसेच व्यवसाय केला व त्यात तोटा आला तर...? असे प्रश्न सर्वसाधारण चाकरमान्यांच्या मनात येतात. त्याच प्रश्नाने माझ्या वडिलांच्याही मनात संभ्रम निर्माण केला व त्यांनी परदेशात जाण्यास तसेच व्यवसाय करण्यास स्पष्ट नकार दिला. लहानपणापासून आईवडिलांनी घरासाठी घेतलेले अपार कष्ट डोळ्यासमोर होते, तसेच आई-वडील हेच आपले परमेश्वर, हे मनावर बिंबलेले असल्याने मी वडिलांची आज्ञा मानली.

मला जलसंपदा खात्याच्या नऊ ठिकाणी हजर होण्याचे आदेश आले. पण इच्छा नसल्याने त्या मी नाकारल्या. सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निवड होणार नाही, असे कळाल्यामुळे मी सार्वजनिक बांधकाम खात्यात निवड झाली तर नोकरी करीन, असे वडिलांना सांगितले. त्यावेळी आम्हा १४० जणांना कॉल आले होते. त्यामध्ये सात अभियंत्यांची निवड झाली. त्यामध्ये माझ्या त्यावेळच्या दुर्दैवाने माझीही निवड झाली व शासकीय नोकरीमध्ये वडिलांच्या इच्छेखातर हजर व्हावे लागले व माझा त्यानंतर शासकीय प्रवास २० सप्टेंबर १९८२ पासून सुरू झाला.

आपण सिव्हिल इंजिनिअर झालो आहोत. काही विशेष प्राविण्य मिळालेले आहे त्यामुळे त्याचा उपयोग आपल्या घरासाठी, आपल्या समाजासाठी, देशासाठी झाला पाहिजे. असे वारंवार वाटायचे. अशावेळी मला शाळेतील पाठ्यपुस्तकातील बा. सी. मर्ढेकरांची कविता आजही आठवते. 'गणपत वाणी बिडी पिताना... म्हणायचा की, या जागेवर बांधीन माडी.... एक दिवशी मरून गेला.' त्यामुळे गणपत वाण्यासारखे फक्त विचार करायचे नाही तर त्याला प्रत्यक्ष कृतीची जोड दिली तर आपल्याला जीवनात काहीतरी केल्याचे समाधान वाटेल असा विचार केला. घरामध्ये आम्ही चार बंधू. सर्वांसाठी मिळून एक मोठे घर बांधू. तेथे सर्वजण एकत्र नांदतील, राहतील असे स्वप्न मी मनाशी बाळगले. परंतु प्रत्येकाचा पिंड वेगळा, स्वभाव वेगळे, व्यवसाय वेगळा यामुळे आम्ही सर्व कुटुंब अद्याप एकत्र असूनही ते शक्य झाले नाही, याबद्दल आजही मला खंत वाटते.

**नोकरीला लागल्यानंतरही माझ्या वडिलांनी व आईने माझ्यावर योग्यवेळी व योग्य संस्कार केले. वडिलांनी दिलेले सल्ले मी आयुष्यभर विसरू शकत नाही. 'खात्यातील कामगार मंडळीवर अन्याय होणार नाही, याची पुरेपर दक्षता घे. कोणावर अन्याय होत आहे, असे दिसले तर तू स्वतः तो दूर होण्यासाठी पुढाकार घे. विनाकष्ट मिळणाऱ्या पैशाला हात लावू नकोस.' 'नीतिमत्तेला कधी ठेच पोहोचू देऊ नकोस, समाजामध्ये पत निर्माण कर, पत असेल तर पैसा साचवून ठेवण्याची गरज नाही.' 'आपल्याजवळ जे ज्ञान आहे ते सतत दुसऱ्यांना देण्याची तयारी कर.'** अशा प्रकारचे विचार वडिलांनी दिले तर आईने मला नम्रता शिकविली, आलेल्या पाहुण्यांचे आदरातिथ्य कसे करावे, जातीधर्माचा भेदभाव करू नये असे शिकविले.

आणि अशा कितीतरी प्रकारच्या दिलेल्या शिदोरीवर मी माझी वाटचाल चालू केली. हेच संस्कार माझ्या सर्व बंधू व भगिनींवरही झाल्याने आम्हा सर्वांचा या विचारांनी एक मोठा माहोल तयार झाला आहे.

त्यामुळे वरील विचारांचा पगडा असल्याने तसेच मी आतून बाहेरून संपूर्ण शासकीय प्रॉडक्ट असल्याने मला शासनामध्ये मिळालेले अधिकार हे मी अधिकार म्हणून न वापरता **'सेवाव्रत'** म्हणून वापरत आहे आणि मला वाटते फक्त याच कारणामुळे मला शासकीय कामामध्ये यश मिळाले आहे.

माझा जीवनप्रवास सुरू झाल्यानंतर दि. १२ मार्च १९८६ रोजी मला माझ्या आयुष्यामध्ये सकारात्मक बदल घडवणारी, आयुष्य व आरोग्य योग्य दिशेने वळवणारी व्यक्ती भेटली. ती म्हणजे सुजाताताई ! म्हणतात ना, सहचारिणी ही फक्त बायको नसते. ती आई, लहान व मोठी बहीण तसेच लहान मोठा भाऊ आणि केअर टेकर म्हणूनही भूमिका निभावते. या सर्व भूमिका मला 'सुजाता'मध्ये दिसून आल्या. त्यामुळे मी अशी सहचारिणी मिळाल्याबद्दल स्वतःला भाग्यवान समजतो.

नोकरीत असताना आपण लोकांसाठी काहीतरी करावे असे खूप वाटायचे. पण कसे करावे, काय करावे, कोणासाठी करावे हे नीटसे उमजत नव्हते. काम चालू होते, पण त्याला कोणतीही रूपरेषा नव्हती. शासकीय नोकरांवर जो वेगळा दबाव असतो, न्यूनगंड असतो तो माझ्यामध्येही होता. त्याचवेळेस मला माझे मित्र विनायक देशमुख यांनी 'मराठा सेवा संघ' या संकल्पनेबाबत कल्पना दिली व मी लगेच त्याकडे आकर्षित झालो. सप्टेंबर १९९० मध्ये अकोला येथे झालेल्या पहिल्याच अधिकृत बैठकीमध्ये मी उपस्थित झालो. **युगपुरुष पुरुषोत्तम खेडेकर सर या चुंबकाने मला 'मराठा सेवा संघा'त आकर्षून घेतले व आजीवन त्याचा अविभाज्य घटक झालो आहे.** ही संघटना नोंदणीकृत असल्याने तसेच शासकीय, निमशासकीय व खासगी क्षेत्रातील व्यक्ती त्याचे सभासद होऊ शकत असल्याने माझ्या नेतृत्वगुणांना तेथे पूर्ण वाव मिळाला व मला ज्या कामामध्ये समाधान मिळते. ते काम करण्याची पूर्ण संधी 'मराठा सेवा संघा'च्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याबद्दल आदरणीय खेडेकर सरांबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो.

मी मराठा सेवा संघाचे काम सुरू केल्यानंतर मला खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलन, अर्थार्जन, संघटन, सकारात्मक दृष्टिकोन, स्त्रीशक्ती, जिजाऊप्रेरणा, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, जगद्गुरू तुकाराम महाराजांचे अध्यात्म या संकल्पनांचे गर्भितार्थ समजले. अज्ञानामधून आपण किती अंधश्रद्धा बाळगतो याचे ज्ञान आले. सत्यनारायण पूजा आजच्या काळामध्ये किती फोल आहे, नवरात्रीमध्ये अशिक्षित महिलांच्या अंगामध्ये देवी संचारते या घटनांचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला. त्यामुळे वास्तवाचे भान आले. मराठा मार्गाच्या माध्यमातून आम्हां नवरा-बायकोचे जे प्रबोधन झाले, त्यातून मराठा सेवा संघाची वैज्ञानिक दृष्टिकोनातील भूमिका बहुजन समाजापर्यंत पोहोच करता आली.

**'संपत्तीपेक्षा संपत्ती निर्माण करणारी संतती निर्माण करा.' 'वाचनामुळे सवयी बदलतात, सवयी बदलल्या तर स्वभाव बदलतो, स्वभाव बदलला तर व्यक्तिमत्त्व बदलते, व्यक्तिमत्त्व बदलले तर भवितव्य बदलते.' 'दातृत्व असेल तर कर्तृत्व येते, कर्तृत्वामुळे नेतृत्व येते व नेतृत्व आले तर समाजाचे प्रबोधन करण्यासाठी वक्तृत्व हवे.' या आणि अशा अनेक साध्या साध्या**

**घोषवाक्यांनी खेडेकर सरांनी त्यांच्या विचारसरणीतून घण मारल्यासारखे आमच्या मेंदूत पक्क्या बसविल्या.** त्यामुळे आम्ही कायमस्वरूपी घडलो गेलो. समाजाला बदलविण्याची ताकद या साध्या साध्या वाक्यांमध्ये आहे यांची जाणीव झाली.

माझे प्रशासकीय, सांसारिक व सामाजिक दृष्टिकोनातून सर्वांत चांगले दिवस अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत या दुष्काळी तालुक्यात गेले. माझी ४ वर्षे नोकरी कर्जतमध्ये झाली. या ४ वर्षांमध्ये मला खूप प्रेमाची माणसे भेटली, अनेक कार्यकर्ते भेटले, खूप चांगले व प्रोत्साहन देणारे वरिष्ठ अधिकारी भेटले, गोडड महाराजांसारखे दैवत भेटले. कर्जत तालुका भौगोलिक व वैचारिकदृष्ट्या अतिशय मागासलेला तालुका होता. त्यामुळे मला सार्वजनिक बांधकाम खात्याच्या माध्यमातून समाजोपयोगी प्रचंड कामे करता आली. सर्व प्रकारचे स्वातंत्र्य असल्याने अतिशय उत्साहात कामे करता आली. स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक यांनी प्रचंड प्रमाणात सहकार्य केले. त्यामुळे कर्जतमधील रहिवास आम्ही कधीही विसरू शकत नाही. माझे जिवलग मित्र दिलीप थोरात, शिवाजी थोरात, विलास निलंगे, पत्रकार गणेश जेवरे, कालिदास शिंदे, बबन म्हस्के अशी अनेक मंडळी कायमची जिवलग झाली. या तालुक्यामध्ये अधीक्षक अभियंता श्री. जगदीश डाबे व श्री. आर. पी. शिंदे तसेच कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत डबले यांच्या मार्गदर्शनाखाली मला रस्ते, पूल व इमारतींची जी कामे करता आली त्याची नोंद शासन दरबारी होऊन या कामांचा मला '**उत्कृष्ट अभियंता**' हा पुरस्कार मिळण्यामध्ये सिंहाचा वाटा होता.

आपले काम प्रामाणिकपणे व समाजाभिमुख केले तर वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक हे आपल्याला डोक्यावर घेतात हा अनुभव मी घेतला आहे. हे मी येथे नम्रपणाने नमूद करू इच्छितो. चांगले प्रशासकीय काम करूनही आपल्याला उत्तम काम करता येते व सामाजिक काम करताना आपल्याला सामाजिक भान अतिशय चांगल्या प्रकारे येते व त्यामुळे आपल्या हातून जनतेला अभिप्रेत असे चांगले प्रशासकीय कामही करता येते. चांगले काम करण्यासाठी कोणताही नियम आडवा येत नाही. उलट केलेले समाजाभिमुख काम इतरांसाठी नियम होतो व त्यामुळे आपल्याला समाजामध्ये आपोआप नैतिक अधिष्ठान प्राप्त होते.

**मी मराठा सेवा संघाचे जरी काम करीत असलो तरी माझे सर्व समाजातील बंधू आणि भगिनींशी घरगुती संबंध आहेत. वैयक्तिक जीवनामध्ये आमचे कुटुंब कोणतेही जातधर्म पाळत नाही. त्यामुळे आमच्या या सामाजिक कार्यात आम्हाला सर्व जातीधर्मातील नागरिक मुक्तहस्ताने मदत करत असतात.**

मला आजपर्यंत जे पुरस्कार मिळाले आहेत. त्यात प्रशासकीय, सामाजिक, अभियांत्रिकी क्षेत्रातील पुरस्कारांचा समावेश आहे. त्या पुरस्कारांचे श्रेय माझे एकट्याचे नसून त्यासाठी मला आशीर्वाद देणारे सर्व मार्गदर्शक, शिक्षक, वडीलधारी आप्तेष्ट, शुभेच्छा देणारे माझे मित्र, माझे कुटुंब, माझे सर्व सहकारी यांनाही त्याचे श्रेय जाते.

माझी सहचारिणी सुजाता याही सिव्हिल इंजिनिअर आहेत. त्यावेळच्या परिस्थितीनुसार नोकरी करता येणार नाही, असे सांगूनही त्यांनी मला त्यांच्या पदरात घेतले व माझ्यासारखा हेकेखोर, आग्या मोहोळ असणारा नवऱ्याचे मधुर रसामध्ये कधी रूपांतर केले हे मला ३२ वर्षातही कळले नाही. **त्याबद्दल मी सुजाताताईच्या ऋणातच राहणे पसंत करीन.** चांगला जीवन साथी भेटायलाही भाग्य लागते. त्या दृष्टिकोनातूनही मी भाग्यवान आहे. त्याही स्वतःला गृहिणी म्हणून घेण्याऐवजी 'होम मेकर' म्हणवून घेतात व त्या संज्ञेस त्या पात्र आहे.

'माँ–बापसे बेटा सवाई' या उक्तीप्रमाणे आम्ही दोघांनी मुलांना घडविण्याचा प्रयत्न केला व त्यामध्ये आम्ही यशस्वी झालो असे मला अभिमानाने सांगावेसे वाटते. चि. प्रतीक व चि. श्रेयस या दोघांनीही त्यांच्या क्षेत्रात कळस गाठला आहे. सामाजिक भावनेचे त्यांना बाळकडू लहानपणापासूनच मिळालेले असल्याने त्यांच्याकडून समाजाची सेवा घडेल अशी खात्री आहे. खेडेकर सरांमुळे जिजाऊंचे व छत्रपती शिवरायांचे विचार आम्ही घेतले व तेच आम्ही मुलांमध्येही पेरले आहेत. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाविषयीही आमच्या मनात कोणतीही शंका नाही. चि. प्रतीकने तर आयपीएस झाल्यानंतर सन २०१५ मध्ये आमच्या सूनबाई चि. प्रीतीबरोबर वैदिक पद्धतीने विवाह न करता शिवधर्म पद्धतीने विवाह केला आहे. अद्याप तरी शिवधर्म पद्धतीने विवाह करणे समाजामध्ये धाडस समजले जाते. याबद्दल सूनबाई प्रीती व तिचे आईवडील यांचे अभिनंदन करतो. चि. प्रीतीचे आम्हास खूप कौतुक वाटते. ती आमची सून नसून मुलगीच आहे. मी माझ्या कार्यालयातील दालनात व घरीसुद्धा जिजाऊ माँसाहेब व छत्रपती शिवराय यांचे फोटो नेहमी डोळ्यासमोरच ठेवतो. त्यामुळे माझ्याकडे अपेक्षेने आलेला प्रत्येक ग्राहक, नागरिक, गरजू हा नेहमी समाधानानेच बाहेर जाईल याची जाणीव मला फोटोकडे पाहून राहात असे.

आठवणी खूप आहेत. लिहायचे बरेच आहे, मनात खूप आहे, काही लिहिले, बरेच लिहायचे आहे, बरेच काही कामही करायचे आहे. जिजाऊ तेवढी प्रेरणा व शक्ती देईलच, याची खात्री आहे.

**शेवटी माझ्या या सर्व प्रकारच्या कार्यात मला प्रचंड प्रमाणात मार्गदर्शन व सहकार्य करणाऱ्या सर्व संघटना त्यामध्ये मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद, डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, शासकीय विद्यानिकेतन, माजी विद्यार्थी संघटना महाराष्ट्र, अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था, कान्हूर परिसर अभियंता प्रतिष्ठान, कान्हूर पठार, पारनेर तालुका मित्र मंडळ पुणे, शासकीय सेवेतील अभियंत्यांची सहकारी पतसंस्था अहमदनगर, सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र, महाराष्ट्र वखार महामंडळ, अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ पुणे, शासकीय नोंदणीकृत ठेकेदार व उद्योजक, सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटना, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे माजी विद्यार्थी, इंडियन रोड कॉंग्रेस नवी दिल्ली, युनिटी ग्रुप पुणे, समस्त कान्हूर पठार ग्रामस्थ मंडळी व समस्त ठुबे परिवार आप्तेष्ट व नातेवाईक या सर्वांचा समावेश होतो. यातील माझे सर्व बंधू–भगिनी यांचेप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. आपल्या मार्गदर्शन व शुभेच्छांची अपेक्षा करून आपल्या ऋणातच राहणे मी पसंत करतो**. धन्यवाद...!

जय जिजाऊ ! जय शिवराय !!

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

**पाणी वाचवा, जीवन वाचवा !**

**With Best Compliments from**

# Rajlaxmi Roofings

## -: Product Range :-

- Galvanised Pre-Coated Sheets
- Galvalume Coated Sheets
- Bare Galvalume Sheets
- Tile Profile Sheets
- Decking Seets (MS/GP Base)
- FRP Sheets (Any Profile)
- PolyCorbonate Sheets
- Turbo Ventilator Fans with Base Plate
- Alluminium Sheets
- GI Sheets, Curve (Crimping) Sheets.

G Block, Plot No. RM-90, Flat No 4, Krishnakunj Society,
Shahunagar, Chinchwad, MIDC, Pune - 411019.

**Mob.: 99224 20583 / 90750 16401/2/3/4**

E-mail : bpawar92@rediffmail.com

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०

संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५